8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## जालना पंचायत समिति गटविकास अधिकाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या गंभीर तक्रारी

### भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांची विभागीय आयुक्ताकडे चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांनी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराच्या गंभीर तक्रारींबाबत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सखोल चौकशी आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. या तक्रारींमुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील नागरिकांचे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत आहे. ज्ञानेश्वरमाऊली शेजूळ यांनी आपल्या पत्रात नमूद केले की, रोजगार हमी योजने अंतर्गत स्मशानभूमी शेड, शाळेच्या कंपाउंड वॉल, गटार नाल्या, पानंद रस्ते आणि विहिरींच्या कामांसाठी मंजूर निधीपैकी १० टक्के रक्कम पवार कमिशन म्हणून घेतात. पानंद रस्त्याच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रत्येक प्रस्तावाला ५०,००० रुपये आणि विहिरीच्या मंजुरीसाठी प्रति लाभार्थी ३०,००० रुपये लाच स्वरूपात आकारली जात असल्याचा जालना तालुक्यातील शेतकऱ्यांचा आरोप आहे. याशिवाय, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना आणि वसंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनांच्या लाभार्थ्यांकडून प्रति लाभार्थी १०,००० रुपये लाच घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यामुळे गरीब आणि गरजू लाभार्थ्यांचे शोषण होत असून, शासकीय योजनांचा मूळ उद्देश डावलला जात आहे. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी सांगितले की, जालना तालुक्यातील अनेक लाभार्थी आणि गावकऱ्यांनी पवार यांच्या भ्रष्टाचाराबाबत लेखी आणि तोंडी तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींमधून पवार यांनी पंचायत समितीच्या अधिकारांचा गैरवापर करून संगनमताने भ्रष्टाचार केल्याचे स्पष्ट होते. यामुळे ग्रामीण विकासकामांवर विपरीत परिणाम झाला असून, शासकीय निधीचा दुरुपयोग झाला आहे. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी विभागीय आयुक्तांना या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्वरित कारवाई करण्याची विनंती केली आहे. याबाबतची प्रतिलिपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी जालना आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना पाठवण्यात आली आहे. याप्रकरणी रोजगार हमी योजना आणि आवास योजनांच्या निधी वितरण, मंजुरी प्रक्रिया आणि अंमलबजावणीची खातेनिहाय चौकशी, दोषी आढळल्यास पवार यांचे तात्काळ निलंबन आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत कायदेशीर कारवाई, तसेच शोषित लाभार्थ्यांना न्याय आणि नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांनी केली आहे. तसेच, जालना पंचायत समितीच्या कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणारी यंत्रणा लागू करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.



युवा आदर्श

### बंगला ...

पद मुक्त झाले तरी
सोडवत नसे बंगला
काय माहीत इतरां
जीव कशास गुंगला
दृष्ट लागू नये कधी
काळा धागा टांगला
आठवणी गोड गोड
छकुला इथे रांगला
ओढ आगळी घराची
संसार सुखात रंगला
सोडुन जायचे बोला
मनोदय कसे खंगला
इथला निसर्ग सुखावे
कंटाळे सिमेंट जंगला
सुखसोयी सर्व काही
कुटूंबीय हरेक दंगला
गृह शांती यज्ञ संपन्न
सर्व केले शुभमंगला
भविष्य वर्तवले भले
भाग्योदय करे बंगला
सत्तेसह संपूर्ण बंगला
पुन्हामिळणार रे मला
कायसांगू रहस्य कुणा
मनोमन बांधला इमला

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्यावर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप; सोशल मिडीयावर 'क्लिन' असल्याचे दाखविण्याचा पवार यांचा केविलवाना प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी -** जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्यावर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहे. त्या संदर्भात विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार देण्यात आली आहे. यासंदर्भातील पोस्ट सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाच्या कामांची माहिती संदीप पवार हे सोशल मिडीयातून जनतेसमोर मांडत आपण 'क्लिन' असल्याचे दाखविण्याचा केविलवाना प्रयत्न करतांना दिसून आले.

जिल्ह्यातील विविध योजना आणि निधी व्यवस्थापनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत काही लाभार्थी व स्थानिक नागरिकांनी गटविकास अधिकाऱ्यांविरोधात शंभर कोटींपर्यंतच्या भ्रष्टाचाराचे आरोप लावले आहेत.

यात शासकीय बांधकामांतून टक्केवारीने वसुली संदीप पवार करत आहेत. स्मशानभूमी, शाळा खोली, अंगणवाडी, गटार योजना आदींसाठी १०-१५% 'कमिशन', घरकुल लाभार्थ्यांकडून १० हजारांची मागणी, सुमारे २०,००० लाभार्थ्यांपैकी अनेकांकडून रक्कम वसूल करण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

पानंद रस्त्यासाठी ५० हजार रुपये, विहीरीसाठी ३० हजार, तसेच बोगस पाच साडेपाच लाखांची बोगस विहीर दाखविण्यासाठी म्हणजेच बोगस बिलासाठी लाखो रुपये वसुलीचा आरोप. बिलांमध्ये बोगस कामे दाखवून निधीचा गैरवापर, धनगर समाजाच्या गरिब लाभार्थ्यांना लक्ष्य केल्याचा आरोप.

**निवेदनाची तयारी आणि संभाव्य संघर्ष**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील वीस लाभार्थी हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देणार आहेत. स्थानिक कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, या निवेदनाच्या वेळी संदीप पवार यांच्या प्रयत्नातून प्रशासन मारहाण किंवा अडथळा निर्माण करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्यावर होणाऱ्या आरोपांची चौकशी होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे

सोशल मिडीयावर व्हायरल झालेल्या मॅसेज मधील काही मॅसेज जसेशा तसे पुढील प्रमाणे

१) जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री संदीप पवार साहेब हे सोशल मीडियावर पंचायत समितीच्या कारभाराची काय परिस्थिती आहे हे सविस्तर शेअर करीत आहेत. परंतु जालना तालुक्यातून विविध योजनेच्या लाभ धारकाकडून वसूल केलेले रोजच्या रोज गटविकास अधिकारी श्री पवार साहेब यांच्याकडे किती लाख रुपये जमा होतात याचा हिशोब गटविकास अधिकारी जनतेला दाखवत नाहीत.

२) आज पर्यंत करोडो रुपये गैरमार्गाने वसूल केलेले गट विकास अधिकारी श्री पवार साहेब हे यापूर्वी जनतेला या अडचणी का सांगत नव्हते याचा हिशोब त्यांनी या ग्रुपवर शेअर करणे आवश्यक आहे.

३) जालना पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी संदीप पवार यांनी स्मशानभूमी बांधकाम शाळा खोली बांधकाम अंगणवाडी खोली बांधकाम भूमिगत गटार योजना हा निधी दहा ते पंधरा टक्के नी विकला आहे. पानंद रस्त्याच्या प्रशासकीय मान्यते करिता ५० हजार रुपये घेतले आहे. जालना तालुक्यात मंजूर झालेल्या सुमारे २० हजार घरकुलाकरता प्रत्येक लाभार्थ्यातून दहा हजार रुपये घेतले आहे. गटविकास अधिकारी संदीप पवार यांची चौकशी केली तर. जवळपास १०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार सापडेल. कधीही संदीप पवार च्या घरी रेड केली तर दहा ते बारा कोटी रुपये त्याच्या घरात असतील. पण जालना जिल्ह्यातील राजकीय नेत्यांचा त्याला आश्रय असल्याने तू एवढ्या रुबाबात बोलतो आहे.

४) विहीरीसाठी ३० हजार, दोन हजार विहीरींना प्रशासकीय मान्यता, साडेपाच लाखांची विहीर बोगसरित्या दाखविण्यासाठी म्हणजेच बोगस बिल काढण्यासाठी लाख-लाख रुपये घेतो..

५) याबाबतीत आम्ही बातमी व्हाट्सअप ग्रुप ला टाकायला चालू केल्यानंतर जालना तालुक्यात असलेल्या १००० लाभार्थ्यांपैकी दहा लाभार्थ्याच्या खात्यात पैसे टाकून.. भ्रष्ट नसल्याचा आणण्याचा प्रयत्न केला आहे.

६) जालना जिल्ह्यात धनगर समाजाचे खंबीर नेतृत्व नसल्याने या धनगर समाजाचा फायदा कसा उचलायचा याचा परिपूर्ण फायदा या गटविकास अधिकाऱ्यांनी घेतला आहे.

७) जालना जिल्ह्यातील अनेक नेत्यांना या गटविकास अधिकाऱ्यांन या बाबतीत मॅनेज केल आहे.

८) जालना पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांची जर खरोखर विभागणी या चौकशी केली तर शंभर कोटी रुपयांचा घोटाळा सापडेल.

९) पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेचे वीस लाभार्थी उद्या चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देणार आहे. यावेळी निवेदनकर्त्यांना मारहाण करून हाकलून देण्याची पूर्ण व्यवस्था प्रशासनाकडून होण्याची दाट शक्यता आहे. कृपया पत्रकारांनी याबाबतीत नोंद घेऊन सर्वसामान्य धनगर समाजातील गोरगरिबांना न्याय द्यावा ही विनंती आहे.

हे वृत्त नागरिकांनी सोशल मिडीयावर केलेल्या आरोपांवर आधारित आहे. त्याची सत्यता स्वतंत्र चौकशीनंतरच निश्चित होईल. कोणावरही आरोप निश्चित मानले जाऊ शकत नाहीत, जोपर्यंत त्याची न्यायिक प्रक्रिया सिद्ध करत नाही.




## नाकापेक्षा मोती जड! आमदारांच्या पीएचा 'रुबाब'

**जालना । प्रतिनिधी -** 'नाकापेक्षा मोती जड' या म्हणीचा प्रत्यय बदनापूर तालुक्यात येत आहे. राज्याचे आमदार जनतेच्या प्रश्नांसाठी स्वतः उपलब्ध असताना, त्यांच्या स्वीय सहायकांचा (पीए) मात्र 'रुबाब' वाढल्याचे दिसत आहे. आमदार नारायण कुचे यांचे स्वीय सहायक (पीए) खंडागळे हे सर्वसामान्य नागरिकांचे फोन उचलत नाहीत, तर दुसरीकडे आमदार कुचे स्वतः फोन उचलून लोकांशी बोलतात. यामुळे जनतेत नाराजीचे वातावरण आहे.

गेल्या काही दिवसांपासून बदनापूर तालुक्यात ही चर्चा सुरू आहे. मतदारसंघातील अनेक नागरिक आपली कामे किंवा समस्या घेऊन आमदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात. थेट आमदारांना फोन लावल्यास ते नम्रपणे बोलतात आणि लोकांच्या समस्या ऐकून घेतात. मात्र, जेव्हा त्यांचे पीए खंडागळे यांना फोन केला जातो, तेव्हा ते 'पीए' असल्याचा रुबाब दाखवत फोन उचलत नाहीत, अशी तक्रार जनतेतून होत आहे.

एकिकडे आमदार लोकाभिमुख असल्याचा प्रयत्न करत असताना, दुसरीकडे त्यांचे पीए अशाप्रकारे वागत असल्याने प्रशासकीय कामकाजावरही परिणाम होत आहे. त्यामुळे आमदारांनी याकडे लक्ष देऊन आपल्या पीएला योग्य मार्गदर्शन करण्याची गरज आहे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच आमदारांच्या तशा सुचना तर नाही नां? असा प्रश्न देखील उपस्थित होतो आहे.




झाडे लावा
झाडे जगवा

## संपादकीय

### विनोद सम्राट शाहीर

आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

# नैसर्गिक महाप्रलय व मुलभूत सुविधांच्या अभावामुळे लोक मरत आहेत; आणि संसदेत पक्ष-विपक्ष एकमेकांवर ताशेरे ओढतात,हे चाल्लय तरी काय!

आपण नेहमी पहातो की बदलत्या हवामानामुळे उत्तराखंड सारख्या अनेक भागांत दरवर्षी महाप्रलयाची स्थिती निर्माण होत असते.ज्या ठिकाणी पर्यटक आपली हजेरी लावुन सरकारची तिजोरी भरत असते.बिहार सारखे अनेक राज्य असे आहेत की तेही पावसाळ्यात जलमग्न होतात व अनेकांचा बळी जातो.त्याचप्रमाणे देशात २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत.या प्रत्येक राज्यात लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी आणि सरकारी यंत्रणा आहे. परंतु आजही प्रत्येक राज्यात काही जिल्हे असेही आहेत की त्या ठिकाणी मुलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो.आजही अनेक गावांमध्ये पुलांची व्यवस्था नाही अशा परिस्थितीत ग्रामस्थ व विद्यार्थी आपला जीव धोक्यात टाकून तारेवरची कसरत करतात व आपले काम पुर्ण करतात. अशा अनेक मुलभूत गोष्टींकडे सरकार, पक्ष-विपक्ष जातीने लक्ष न देता व अशा महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा न करता राजकीय डावपेचांच्या चर्चा करून संसदेचा वेळ वाया घालवितात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.आज महागाई विकोपाला जाऊन पोहोचली, अनेक राज्यांमध्ये आजही कुपोषणाची परिस्थिती आहे यावर कोणीच चर्चा करण्यास तयार नाही, शिक्षण अत्यंत महागडे झाले आहे यावरही चर्चा करण्यास कोणी तयार नाही,टेरिफ युद्धामुळे सर्वसामान्य व गरीब यांच्यावर भार पडत आहेत,शेतकऱ्यांच्या आत्महत्यां अजुन पर्यंत थांबलेल्या नाहीत,बेरोजगारी वाढतच आहे, नवीन धोरणानुसार कंत्राटी पद्धतीने भरतीला सुरूवात केली आहे, निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा पाच वर्षांपर्यंत काम करण्याची संधी सरकार देत आहे आणि राजकीय पुढारी दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे.या संपूर्ण गोष्टींमुळे मुलभूत सुविधां, शेतकऱ्यांच्या समस्या,बेरोजगारी व महागाई यावर अजून पर्यंत अंकुश लागु शकला नाही.कारण संसदेत पक्ष-विपक्ष जास्तीत जास्त फक्त राजकारणावरच चर्चा करतांना दिसतात यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे आणि देशातील मुलभूत सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे.आज सर्वच क्षेत्रात अत्याधुनिक सुविधा मोठ्या प्रमाणात आहेत. रस्त्यांचे जाळे संपूर्ण भारतात विनल्या गेले आहे. परंतु या संपूर्ण सुविधांवर पावसाळ्यात पाणी फेरल्या जाते व अनेक भाग जलमग्न होतांना आपण पहातो व याचा परिणाम देशातील गरीब व सर्वसामान्यांना भोगावे लागतात. आज आपण जगाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर धार्मिक स्थळी चेंगराचेंगरी प्रमाण भारतात मोठ्या प्रमाणात वाढले आहे यावर आपण अजून पर्यंत नियंत्रण ठेवू शकलो नाही किंवा यावर संसदेत चर्चा होत नाही.अशा अनेक भयावह घटना डोळ्यासमोर होत आहे. परंतु पक्ष विपक्ष फक्त आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी लिपापोती करतात व सर्वसामान्यांना वाऱ्यावर सोडून देतात ही सत्य परिस्थिती आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यांना कल्पना असते की पावसाळ्यात अती दुर्गम भागात किंवा पहाडी भागात ढगफुटी,पहाड कोसळने किंवा नद्यांना महापुर येणे अशा अनेक भयावह घटना होतात अशा परिस्थितीत केंद्र व राज्य सरकारे समन्वय साधून वेळेच्या आधीच नागरिकांना हलविने किंवा धोकादायक स्थळावरील पर्यटकांवर पुर्णतः बंदी घालने असे कठोर उपाययोजना का केल्या जात नाहीत? आपण पहाले की देशातील अनेक राज्यांमध्ये ढगफुटीच्या घटनेमुळे डोंगराच्या पायथ्याशी असलेली गावे जमीनदोस्त झालीत व मोठ्या प्रमाणात प्राणहानी सुध्दा झाली आणि आताही होत आहे याचे जिवंत उदाहरण दिनांक ५ ऑगस्ट २०२५ उत्तराखंडच्या पर्वतीय भागातील उत्तरकाशीमध्ये ढगफुटीचा मोठा तडाखा बसला असुन गंगोत्री मार्गावरील धराली गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने हाहाकार माजला व या घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण अजूनही ढीगाऱ्याखाली दबले आहेत व त्यांची घरे सुध्दा जमीनदोस्त झाली आहे.अशा घटनांकडे राज्य सरकार व केंद्र सरकारने अलर्ट रहाने गरजेचे आहे. कारण बदलत्या हवामानामुळे सुनामी, ढगफुटी, ग्लेशियर वितळने, भुस्कखलन, भुकंप, अती पाऊस, अती उष्णता, समुद्राची पातळी वाढने अशा अनेक भयावह व अंगावर शहारे येणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढण्याची दाट शक्यता आहे. परंतु ज्या दुर्घटनांपासुन आपण मानवजातीला वाचवु शकतो व वाचवण्यासाठी पुर्वतयारी करू शकतो अशा घटनांवर सरकारचे नियंत्रण असने अत्यंत गरजेचे आहे.कारण नैसर्गिक आपदा कधिच सांगुन येत नाही त्यामुळे ती केंव्हा भयानक रूप धारण करेल याची आपण कल्पना सुद्धा करू शकत नाही.त्यामुळे संपुर्ण राज्य सरकारांनी पर्यटकांना व धोकादायक स्थळावरील लोकांना सतर्क करून त्यांना महाप्रलयच्या आधीच हलविले पाहिजे जेणेकरून जीवित हानी व वित्तीय हानी रोखण्यास मदत होईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

---

सनातन संस्थेला 'दहशतवादी' म्हटल्याप्रकरणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना १० कोटींची मानहानीची नोटीस!

# बिनशर्त माफी मागा; अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जा!

## सनातन संस्थेचा पृथ्वीराज चव्हाण यांना इशारा

**पुणे -** नुकताच मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल लागला. त्यानंतर 'भगवा दहशतवादा'च्या काँग्रेसी षड्यंत्राचा बुरखा फाटला. त्यानंतर सारवासारव करतांना काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आधी 'भगवा दहशतवाद' म्हणू नका, तर 'सनातनी दहशतवाद' म्हणा, असे म्हणत सनातन धर्मावर पुन्हा टीका केली. त्याविषयी स्पष्टीकरण देतांना त्यांनी धर्माला नव्हे, तर मी सनातन संस्थेला 'आतंकवादी संघटना' म्हणाले, असे वक्तव्य केले. हे वक्तव्य खोटे, बिनबुडाचे आणि दिशाभूल करणारे असून या प्रकरणी सनातन संस्थेचे विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांच्या वतीने त्यांना १० कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवण्यात आली आहे. तसेच पृथ्वीराज चव्हाण यांनी सनातन संस्थेची बिनशर्त माफी मागावी अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा इशारा सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिला आहे.

या नोटिसीमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी १५ दिवसांच्या आत लेखी माफी मागणे, मूळ मुलाखतीइतक्याच प्रसिद्धीने ती माफी प्रसिद्ध करणे, भविष्यात कोणतीही बदनामीकारक विधाने न करणे आणि १० हजार रुपये कायदेशीर खर्च भरपाई देणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. संस्थेचे मानद कायदेशीर सल्लागार तथा मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता रामदास केसरकर यांनी नोटिशीत म्हटले आहे की, चव्हाण यांच्या वक्तव्यामुळे सनातन संस्थेची प्रतीमा मलीन झाली असून हजारो साधकांच्या भावना दुखावल्या आहेत. ही नोटीस मिळूनही उत्तर न दिल्यास चव्हाण यांच्यावर फौजदारी आणि दिवाणी खटले दाखल करण्यात येणार आहेत.

या विषयी अधिक माहिती देतांना श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की, पृथ्वीराज चव्हाण आज सांगत आहेत की, 'भगवा' हा महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीचा, छत्रपती शिवरायांचा, संत ज्ञानेश्वरांपासून सर्व संत आणि वारकऱ्यांचा पवित्र भगवा आहे. त्यामुळे कोणीही भगवा दहशतवाद'' असे कोणी म्हणू नये, असे काँग्रेसी नेत्यांना आवाहन करत आहेत; पण जेव्हा मालेगाव प्रकरण झाले, त्या वेळी काँग्रेसी नेते पी. चिदंबरम्, दिग्विजय सिंह, सुशीलकुमार शिंदे आदी नेत्यांनी यथेच्छ 'भगवा दहशतवाद' म्हणत हिंदूंना लक्ष्य केले. तेव्हा चव्हाण यांना 'भगवा' छत्रपतींचा आहे, संतांचा आहे, हे लक्षात आले नाही का? इतकी वर्षे ते झोपले होते का?, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

---

# नारळी पौर्णिमेचे महत्त्व




वरुणदेवतेची कृपा आपल्यावर आणि आपल्या कुटुंबियांवर सदैव रहावी, यासाठी समुद्रकिनारी रहाणारे आणि समुद्राच्या माध्यमातून आपला चरितार्थ चालवणारे श्रावण पौर्णिमेच्या दिवशी वरुणदेवतेची पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करतात. ही पूजा करण्यामागील शास्त्र या लेखातून स्पष्ट केले आहे. श्रावणी पौर्णिमेलाच नारळी पौर्णिमा असेही म्हणतात.

नारळी पौर्णिमेचे आध्यात्मिक महत्त्व ! - पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला भरती अधिक प्रमाणात येते, तर अमावास्येला ओहोटी अधिक प्रमाणात येते. श्रावण पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला प्रार्थना करून फुले आणि श्रीफळ अर्पण करतात. पावसाळ्यात खवळलेला समुद्र शांत होऊन त्याने त्याची मर्यादा ओलांडू नये, अशी त्याला प्रार्थना केली जाते. समुद्र शांत झाल्यानंतरच मासेमार आणि जहाजांद्वारे समुद्री प्रवास अन् व्यापार करणारे लोक त्यांची निहित कर्मे पूर्ण करू शकतात.

सूर्याच्या उष्णतेमुळे समुद्रातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन ढग तयार होतात आणि त्यामुळे पाऊस पडतो. नियमितपणे पाऊस पडण्यात सूर्यासह समुद्रदेवाचेही मोलाचे योगदान आहे. समुद्राच्या पूजनाने एक प्रकारे वरुणदेवाच्या विराट रूपाचे पूजन करून वरुणदेवाचा आशीर्वाद प्राप्त केला जातो. समुद्रदेवाचे पूजन केल्यामुळे समुद्रदेव आणि वरुणदेव यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते.

पृथ्वीवरील निसर्गाचा समतोल राखण्यासाठी नद्या आणि समुद्र यांचा मोलाचा वाटा आहे. समुद्राचे पूजन करून कृतज्ञता व्यक्त होते.

समुद्र पूजन करायची पद्धत - श्रावण पौर्णिमेला समुद्रकिनारी रहाणारे लोक वरुणदेवतेप्रीत्यर्थ समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात. या दिवशी अर्पण करावयाचे नारळ हे फळ शुभसूचक आहे, तसेच ते सर्जनशक्तीचेही प्रतीक मानलेले आहे. नदीपेक्षा संगम आणि संगमापेक्षा सागर जास्त पवित्र आहे. 'सागरे सर्व तीर्थानि' असे वचन आहे. सागराची पूजा म्हणजेच वरुणदेवतेची पूजा. जहाजांनी मालाची वाहतूक करतांना वरुणदेव प्रसन्न असल्यास तो साहाय्य करतो.

नारळी पौर्णिमच्या दिवशी करायची प्रार्थना - नारळी पौर्णिमेच्या अगोदर समुद्राला भरती येणे, तसेच लाटांचे प्रमाण अधिक असणे, यांमुळे समुद्र खवळलेला असतो. नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्रदेवतेला नारळ अर्पण करतात. तसेच 'तुझ्या रौद्ररूपापासून आमचे रक्षण होऊ दे आणि तुझा आशीर्वाद प्राप्त होऊ दे', अशी प्रार्थनाही करतात.

समुद्राला नारळ अर्पण कसा करावा ? - नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्रात नारळ अर्पण करतांना तो पाण्यात फेकतात. त्यामुळे नारळ अर्पण करण्यामागील अपेक्षित लाभ मिळत नाही; त्यामुळे तो भावपूर्ण हळुवारपणे पाण्यात सोडावा अन् वरील प्रार्थना करावी !

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

**संपर्क- ९२८४०२७१८०**

---

# रानकवी ना. धों. महानोर यांच्या कवितेत शब्दांना मातीचा गंध देण्याचे कसब!

## स्मृतीदिन कार्यक्रमात डॉ. संजीवनी तडेगावकर यांचे प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी -** रानकवी ना. धों. महानोर यांच्या कवितेत शब्दांना मातीचा गंध देण्याचे कसब होते, त्यांनी आपल्या कवितेतून मराठवाड्यातील बोलीभाषेचा वापर केला, त्यामुळे मराठवाड्यातील मातीचा गंध महाराष्ट्रभर दरवळत असून आपल्या काव्य, शिल्पातून निसर्ग-रान व माणूस यांची जणू सोयरीक जुळवून दिली आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले.



अनुभव प्रतिष्ठान, राष्ट्रमाता स्पर्धा परीक्षा केंद्र व लोकमंगल प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी ज्येष्ठ चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रमाता स्पर्धा परीक्षा केंद्रात आयोजित ना. धों. महानोर यांच्या द्वितीय स्मृतिदिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ग्रामीण कथाकार, कवी डॉ. प्रभाकर शेळके, राष्ट्रमाता स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक अनिलकुमार धारे, संचालिका चंदाताई धारे, लोकमंगल प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र घुले, अनुभव प्रतिष्ठानचे सचिव पंडितराव तडेगावकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. तडेगावकर पुढे म्हणाल्या,ना. धों. महानोर यांनी बालकवी, बहिणाबाई यांच्या कवितेचा वारसा आपल्या रानकविता व निसर्ग कवितेतून समृद्ध केला. कवितेत ग्रामीण जीवन शब्दबद्ध करणारे ना. धों. महानोर हे एकमेव कवी होते. गावगाड्यातील गोष्टी सोप्या शब्दात मांडत निसर्ग व रानकवितेतून निसर्गाला बोलतंच नव्हे डोलायला व नाचायला लावणारे कवी म्हणून ना. धों. महानोर यांची अख्ख्या महाराष्ट्राला ओळख झाली, मराठी रसिकांच्या मनात हक्काचे स्थान प्राप्त केले.मराठवाड्यातील बोलीभाषेचा वापरामुळे मराठवाड्यातील मातीचा गंध महाराष्ट्रभर दरवळत असल्याचे डॉ. तडेगावकर यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात श्रीधर अंभोरे यांनी ना. धो. महानोर यांच्या काव्य संपदेत ग्रामीण भागातील जीवन प्रकट होते, त्यांच्या कविता ह्या अजरामर असल्याचे सांगून ना. धो महानोर यांच्या आठवणी कथन केल्या.

डॉ. प्रभाकर शेळके यांनी ना. धो. महानोर यांच्या कवितेतून गावातील मातीचा सुंगध सतत दरवळत राहणार असल्याचे सांगून ना .धों.महानोर यांची ' सयी बाई गं' ही कविता सादर केली.

अनिलकुमार धारे यांनी स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना साहित्य विषयक ज्ञान अवगत व्हावे, यासाठी साहित्य विषयक कार्यक्रमांची गरज असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात पंडितराव तडेगावकर यांनी पाणी अडवा, पाणी जिरवा, सह ना. धो. महानोर यांनी विधीमंडळात केलेल्या भाषणांतून शासनाने योजना निर्माण केल्या असे सांगून रानकवितेतून ग्रामीण भागातील निसर्गाला साद घातली. त्यांच्या कवितेतून ग्रामीण महिलांचे अस्सलपण रेखाटले, असे तडेगावकर यांनी नमूद केले.

प्रारंभी ना. धो. महानोर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सुत्रसंचालन आशिष रसाळ यांनी केले तर कु. वैष्णवी जोशी हिने आभार मानले. कार्यक्रमास विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्ह्याच्या विकासाच्या प्रक्रियेत पत्रकारांच्या सहकार्याची गरज - ना.अजित पवार

## जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने भव्य स्वागत समारंभ

**बीड । प्रतिनिधी -** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांचा ७ ऑगस्ट रोजी बीडमध्ये जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने भव्य दिव्य असा स्वागत समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमात बोलतांना ना.पवार यांनी बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाचा आढावा घेत असताना या प्रक्रियेत पत्रकारांचे सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले. येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधुन बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे सुरु करण्याचा प्रयत्न असल्याचे अजित दादांनी या प्रसंगी सांगितले.

### पत्रकार सन्मान योजनेत २० हजार रुपये पर्यंत वाढ

कै.बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचे मानधन २० हजार रु.पर्यंत वाढवण्यात आले आहे. त्याबद्दल राज्याचे अर्थमंत्री म्हणून ना.अजित दादा पवार यांचा पत्रकार संघाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

### साहित्यीक, कलावंतांची उपस्थिती

बीड जिल्हा पत्रकार संघाने आयोजित केलेल्या अजित दादांच्या स्वागत समारंभाला संगित क्षेत्रातील जेष्ठ गायक भरत अण्णा लोळगे, अनिल हंप्रस,सतीश सुलाखे, प्रकाश मानूरकर तसेच साहित्य क्षेत्रातील डॉ.विद्यासागर पाटांगणकर,प्राचार्य सविता शेटे, नाट्य क्षेत्रातील डॉ.सुधीर निकम,डॉ.संजय पाटील देवळाणकर आदि उपस्थित होते. या सर्व साहित्यीक व कलावंतांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार केला.

### महिला पत्रकारांचे रक्षाबंधन आणि दादांना दिले विमान

पत्रकार संघाच्या कार्यक्रमात महिला पत्रकारांनी अजित दादांना रक्षाबंधना निमित्त राखी बांधली. तसेच बीडमध्ये विमानतळ मंजुर केल्याबद्दल संपादक वैभव स्वामी यांनी दादांना विमानाची प्रतिकृती भेट दिली.

एका हॉटेलच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला आ.प्रकाश सोळंके, आ. विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, बीड विधानसभा राष्ट्रवादीचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या हस्ते ना.अजित पवार यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देवून यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संतोष मानूरकर यांनी अजित दादांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली.बीड शहराच्या जायकवाडी बॅक वॉटर योजनेला मान्यता देण्याचे काम अजित दादांच्या नेतृत्वाखाली झाले होते आणि आज बीडचे पालकमंत्री म्हणून विकासाच्या बाबतीत बीड जिल्हा सर्वांगिण प्रगती करत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी बोलतांना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा आलेख मांडला. हा जिल्हा पुरोगामी विचारांचा असून शरद पवार यांच्या नंतर अजित पवार यांना या जिल्ह्याने साथ दिली. या पुर्वी विलासराव देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद भुषवले होते. त्यानंतर ते मुख्यमंत्री झाले. तोच योग अजित पवार यांच्या बाबतीत घडून यावा अशी अपेक्षा मुंडे यांनी व्यक्त केली. गतवर्षी दिक्षाभूमी ते मंत्रालयापर्यंत निघालेल्या पत्रकारांच्या संवाद यात्रेने राज्यभरात पत्रकारांची अभुतपुर्व एकजुट झाली असून



त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घ्यावा असे मुंडे म्हणाले.

या कार्यक्रमात बोलतांना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी गेल्या दोन दिवसात जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत घेण्यात आलेले निर्णय तसेच बैठकांची माहिती दिली. बीड जिल्हा विकासाच्या बाबतीत गतीमान करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु आहेत. प्रशासनात पारदर्शकता येण्यासाठी चांगल्या अधिकार्यांची नियुक्ती आपण केली आहे.नवीन प्रशासकिय इमारती दर्जेदार पध्दतीने व्हाव्यात यासाठी बांधकाम विभागाचे तज्ञ अधिकारी काम पहात आहेत. बीड शहरातील विद्युत पोल वरील तारांचे जाळे कमी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे शहराचे सौंदर्य आणखी वाढेल. या सर्व गोष्टी करताना काही कठोर निर्णय सुध्दा आम्हाला घ्यावे लागतील. त्यासाठी नागरिकांनी आणि पत्रकारांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.बीड जिल्हा पत्रकार संघाने केलेल्या सत्काराबद्दल समाधान व्यक्त करताना अजित दादा म्हणाले की, काम करत राहणे हा आमचा पिंड आहे. केलेल्या कामाचे प्रदर्शन न करता ही आपली जबाबदारी आहे असे आम्ही समजतो.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.जाधव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी तोंडे यांनी परिश्रम घेतले.

# दलित आदिवासी भूमिहिन कास्तपट्टे नावे करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरु करावी - ॲड. भास्कर मगरे

**परतुर । प्रतिनिधी -** आमदार-खासदार,संस्था चालकांचे बेकायदेशिर अतिक्रमण निष्काशित करुन दलित आदिवासी भूमिहिन कास्तपट्टे नावे करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरु करावी, असे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे म्हणाले. परतुर-मंठा तालुकास्तरीय मेळावा परतुर येथे घेण्यात आला.

त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा जालना-मुंबई भुमिहिन लाँगमार्च प्रणेते ॲड. भास्कर मगरे बोलत होते. पुढे ते म्हणाले की, जालना जिल्ह्यात आजी-माजी आमदार खासदार आणि संस्था चालकांचे साखर कारखाने सह सुत गिरण्या आणि इतर खाजगी संस्थाचे मोठ्या प्रमाणात शासकीय पड व गायरान जमीनीवर बेकायदेशिर अतिक्रमण झाले आहे. ते निष्काशित करण्याची हिंमत नाही. मात्र शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० च्या दरम्यान शेतीसाठी झालेले दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे अतिक्रमण कायदेशिर असतांना निष्काशीत करण्याचे प्रयत्न जिल्हा प्रशासन करीत आहे. हे अन्याय कारक आहे. ही बाब शिवसेना दलित आघाडी कदापि सहन करणार नाही. यासाठी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरणार असल्याचा इशाराही ॲड. भास्कर मगरे यांनी दिला.

जगपाल व इतर वि. पंजाब सरकार मध्ये सर्वोच्च न्यायालयाने २८ जानेवारी २०११ रोजी निर्णय दिला आहे. त्या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय १२ जुलै २०११ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० च्या दरम्यान राज्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुलित करण्याबाबत यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे. अशी अतिक्रमणे तसेच शाळा, दवाखाना, किंवा इतर सार्वजनिक प्रयोजनार्थ बांधकाम यांची अगोदरच अस्तित्वात असलेली अतिक्रमणे वगळण्यात यावीत. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की, वरील परिच्छेद ७(४) मध्ये नमुद केलेल्या प्रयोजना व्यतिरिक्त यापुढे म्हणजे १४ एप्रिल १९९० च्या नंतरची शासकीय पड जमीनीवरील झालेले अतिक्रमणे तथा अनाधिकृत झालेले बांधकामे फार जुनी असलेली व बांधकामावर फार खर्च झाला असला तरी तात्काळ निष्काशित करण्याचे आदेश तहसिलदार यांना देण्यात आले आहेत. अशा जमीनीवर भविष्यात कोणतीही अतिक्रमणे होणार नाही. याची दक्षता घ्यावी. मात्र जिल्ह्यात आजी-माजी आमदार-खासदार संस्था चालकांचे अतिक्रमणे बेकायदेशिर



असून सर्व अतिक्रमणे १४ एप्रिल १९९० च्या नंतरची आहेत. प्रशासन त्या बेकायदेशिर अतिक्रमणाला पाठीशी घालून दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे शेतीसाठी झालेली अतिक्रमणे जे कायदेशिर आहेत ते निष्काशित करण्याचे काम सुरु आहे आणि म्हणून आमदार-खासदार, संस्था चालकांचे बेकायदेशिर अतिक्रमणे हटवा निष्काशित करा आणि कायदेशिर दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे शेतीसाठी झालेले अतिक्रमणे नियमानुकूलित करुन सातबारा उतारा देण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरु करावी, असेही मगरे म्हणाले. यावेळी अण्णासाहेब बाळराज, जय खरात, बाळासाहेब भदरगे, संभाजी फुपाटे, मधुकर मोरे, साबळे यांच्यासह मोठ्या संख्येने परतुर-मंठा तालुक्यातील दलित आदिवासी कास्तकार आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# महानगरपालिकेकडून घरकुल-जागा उपलब्ध न झाल्यास १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण

## दिव्यांग संघटनांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील दिव्यांगांसाठी घरकुल आणि जागा उपलब्ध करण्याच्या मागणीसाठी शिवसेना दिव्यांग आघाडी आणि सकल दिव्यांग सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत. महानगरपालिकेकडे अनेकदा आंदोलने, मोर्चे आणि निवेदने देऊनही दुर्लक्ष केले जात असल्याने, १४ ऑगस्टपर्यंत घरकुल व जागा उपलब्ध न झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा या संघटनांनी दिला आहे. शिवसेना दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल मगदूले, शेख इस्माईल, अंकुश वाकचौरे आणि सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, सविता बोराडे, रेणुका वाळूकर, राजेश काविटी आदींनी हा इशारा दिला आहे. या मागणीसाठी यापूर्वीही जालना महानगरपालिकेकडे विविध मार्गांनी पाठपुरावा करण्यात आला आहे, मात्र महानगरपालिकेकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. दिव्यांगांना हक्काचे घरकुल आणि जागा मिळावी यासाठी हे उपोषण करण्यात येणार आहे.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेला भेट

**जालना -** जिल्ह्याच्या नवनिर्वाचित जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेला सदिच्छा भेट दिली. भेटी दरम्यान जालना जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक मंगेश केदार आणि प्रशिक्षण संस्थेचे संचालक गिरीश सुलताने यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत केले. पुढे जिल्हाधिकारी यांनी ब्युटी पार्लर चे प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांशी संवाद साधून संस्थेविषयी समाधान व्यक्त करत आवश्यक ते बदल करण्याविषयी सूचना केल्या. महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था ही ग्रामीण भागातील १८ ते ४५ या वयोगटातील महिला आणि पुरुष यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविते. या भेटीच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत ही योजना पोहोचावी हा जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीमागील उद्देश होता. सदरील प्रशिक्षण केंद्र सतकर कॉम्प्लेक्स अंबड चौफुली येथे चालते आणि येथे मसाला उद्योग, शिलाई काम, फॅशन डिजाईनींग, ब्युटी पार्लर, मेन्स सलून, हाऊस वायरिंग, मोबाईल रिपेरिंग, कुकूट पालन, शेळी पालन, मशरूम लागवड, कृषी उदयमी, मेणबत्ती बनवणे, दुग्ध व्यवसाय इत्यादी विषयांवर प्रशिक्षण दिले जाते तरी इच्छु नागरिकांनी संस्थेला भेट देऊन शासकीय प्रशिक्षण योजनेचा लाभ घ्यावा.

## डोणगाव येथे साहित्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील डोणगाव येथे मंगळवारी रोजी सायंकाळी भव्य मिरवणूक काढून जयंती साजरी करण्यात आली सर्वप्रथम साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पा अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी अण्णाभाऊ साठे उत्सव समितीचे अध्यक्ष नायबराव लोखंडे उप अध्यक्ष रामदास लोखंडे मा जिल्हा परिषद सदस्य दत्तु पंडित. सरपंच कुंडलिक घोडके मा. सरपंच गंगाधर खरात उपसरपंच मिलिंद जाधव बाबासाहेब पुंगळे परशुराम रधाळे मारूती पुंगळे मनोज पिपळे, संजय लोंखडे देवीदास लोंखडे गणेश लोंखडे रामेश लोंखडे संतोष लोंखडे दादाराम लोखंडे मोहन नाडे शामु दनके संदीप लोखंडे राजु दनके गणेश लोखंडे शामील लोखंडे अमोल पाटुळे कैलास घोरपडे रूपेश फतपुरे अर्जुन लोखंडे. पोलीस कर्मचारी नागरे साहेब बेडवाल साहेब गावजी लोखंडे जय लहुजी मित्र व गावकरी ग्रंमपचायत सदस्य कर्मचारी उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे लोकशाहीर आणाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली .
कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोक मान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.
या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पत्रकार रावसाहेब अंभोरे तसेच अंबादास पांढरकावळे, रुस्तुम जोशी , जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पंजाब लहाने, जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन वायाळ यांची उपस्थिती होती.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक संजय फलटणकर यांनी केले. कार्यक्रमाविषयी बोलताना रावसाहेब अंभोरे म्हणाले की, शाळेमध्ये अशा महान पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे म्हणजे महापुरुषांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देणे.

यामध्ये शाळेतील रेड हाऊस मधील आदित्य म्हस्के ,रोहित राऊत ,जनार्दन म्हस्के, सत्यम भोरे ,सोहम पैठणे, ग्रीन हाऊसमधील विघ्नेश म्हस्के, रोहन पैठणे, गौरव म्हस्के, शितल सोनसाळे, ब्लू हाऊसमधील आयुष उगले, प्रगती वरगने, सृष्टी चेके, समीक्षा हिवाळे, येलो हाऊस मधील पार्थ कराळे, आदित्य राऊत या विद्यार्थ्यांनी भाषणातून मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर स्टुडन्ट ऑफ द मंथ यामध्ये हर्षल गाडे, सार्थक वरगणे, युग बोराडे, तनुष उगले, शिवराज पिंपळे, रीनाज पठाण, प्रथमेश नवले,



प्रगती सपाटे, आदित्य म्हस्के, वैष्णवी बोराडे, तसेच होमवर्क हिरो शौर्य म्हस्के, आयुष्य भालेराव, तनुजा गोफणे, तनुजा म्हस्के ,स्वराज फलके, आदित्य जाधव, आरुष मुनेमाणिक, आराध्या उबरहंडे, पार्थ जाधव, आनंद जाधव ऑलवेज स्पिक इन इंग्लिश यामध्ये भूमिका धनवई, आर्या आराख, शिवराज जगदाळे, आयुष उगले, आदर्श अहिरे या विद्यार्थ्यांना बॅज देण्यात आल्या .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे विद्यार्थी आराध्या उबरहंडे व आभार प्रदर्शन आनंद जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी गजानन वायाळ ,अमोल तेलंग्रे, विनोद उबरहंडे ,शरद राजभोज, विशाल शिंगणे, आदित्य इंगळे, विनोद धवलिया, समाधान सुरवसे, भागवत लहाने,वनिता सुद्रिक, रोहिणी सोळुंके, स्नेहल रिंढे अश्विनी दूनगहू, सुनिता मोरे, सोनल मापारी, शंकर सवडे, शंकर मोढेकर, विमल मदन यांची उपस्थिती होती.

# मिळकत नामांतरासाठी महसुल मंत्र्यांनीच स्वतः त्यांच्या खात्यात पैसे स्वीकारावे - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात व सर्व तालुक्यात खरेदीखता आधारे तलाठी व महसुल अधिकारी यांना नामांतर करण्यासाठी पैसे दिल्याशिवाय होत नाही. विशेष म्हणजे कायद्यात तरतूद आहे की, खरेदीखत आधारे नामांतर महसुल अधिकाऱ्यांनी कोणतेही शुल्क न घेता ज्यावेळी नोंदणीकृत दस्त होतो त्याचवेळी नोंदणी अधिकारी संबंधीत महसुल अधिकाऱ्यांना नामांतर साठी माहिती देतात. तरी देखील सातबारावर खरेदीखत आधारे नामांतर होत नाही. त्याच प्रमाणे अकृषीक आदेश व ले-आऊट मंजूर झाल्यानंतर सुद्धा ७/१२ वेगवेगळे प्लॉट प्रमाणे होत नाही. नामांतरासाठी वाटेल ती रक्कम कनिष्ठ ते वरिष्ठ अधिकारी मागत असतात. जिल्हाधिकारी यांनी जर एखाद्या प्रकरणात नामांतर संदर्भात आदेश दिला असेल तर त्या आदेशाची पायमल्ली करण्यासाठी तलाठी थेट विधी अधिकारी यांचा सल्ला जिल्हाधिकारी यांचा आदेश विधी अधिकारी यांना न दाखविता परस्पर घेतात तथा पैसे मिळाल्याशिवाय नामांतर करित नाही. जाफ्राबाद, मंठा व सर्व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर फेरफार खरेदीखत आधारे प्रलंबीत आहे. त्याम ुळे आता महसुल मंत्री श्री बावणकुळे साहेबांनीच नाम ंतरासाठी एक दर जाहीर करावे व ती रक्कम त्यांनी स्वतः स्वीकारावी जेणेकरून नामांतराची खात्री सर्व साम ान्याला होईल, अशी मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे.

# अतिवृष्टीमुळे बाधीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

## तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील बेलोरा परिसरात अतिवृष्टीमुळे तलाव फुटून शेतजमिनी व घरे मोठ्या प्रमाणात बाधीत झाली असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी नुकतेच जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांची भेट घेऊन बाधीत शेतकऱ्यांना तत्काळ नुकसानभरपाई देण्याची म ागणी केली.

बोराडे यांनी बेलोरा येथील तलाव फ ुटीमुळे झालेल्या नुकसानीची विशेष माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली आणि प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून तातडीने पंचनामे करण्याची विनंती केली.

तसेच, नुकत्याच जालना जिल्ह्यात पदभार स्विकारलेल्या जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांचे स्वागत करून, शेतकऱ्यांच्या अडचणी सम जावून सांगितल्या. तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांत प्रशासनाने भ्रमण करून परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्यासोबत काही स्थानिक कार्यकर्ते व शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.



# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१४ ऑगस्ट २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅप्रीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.म ो.९४२३७३०९३२ येथे दि.१४ ऑगस्ट २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.